महाराष्ट्र शासन
• वन विभाग •

Lifestyle for Environment

दुरध्वनी क्रमांक : 02527/272096
फॅक्स क्रमांक : 02527/272096
ईमेल : dcfshahapur@gmail.com,
dycfshahapur@mahaforest.gov.in

# उप वनसंरक्षक, शहापूर वनविभाग, शहापूर यांचे कार्यालय

शहापूर-आसनगांव रोड, जूना आग्रारोड, आसनगांव, मु.पो.ता. शहापूर, जि. ठाणे 421 601

क्रमांक - कक्ष-6(2)/28/वृक्षा/ 388 /2025-26 दिनांक 2 / 7 / 2025

प्रति,

मुख्य वनसंरक्षक (प्रा),
ठाणे

विषय:- वनजमिन ठाणे व नाशिक
मे. जेएसडब्लू एनर्जी पीसएसी लि. मुंबई यांना भावली पंप स्टोरेज प्रोजेक्टचे बांधकाम करण्यासाठी ठाणे व नाशिक जिल्हयातील 243.74 हे. वनजमिन वळतीकरणाबाबत.

संदर्भ:- 1. महसूल व वनविभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक एफएलडी-3623/प्र.क्र.187/फ-10, दिनांक 4/6/2025
2. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य नागपूर यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष-17/नोडल/एफसीए-S-1/पीआयडी-153240/25-26/543, दिनांक 5/6/2025
3. आपले कार्यालयाकडील पत्र क्रमांक कक्ष-10/वसं/अ-20/कावि-80/24-25/86, दिनांक 10/6/2025
4. या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-6(3)/20/जमीन/911, दिनांक 24/6/2025
5. जेएसडब्लू पीएस टू लि. यांचेकडील पत्र क्रमांक JSW/PSP-Bhavali/Site/25-26027, दिनांक 24/6/2025

विषयांकित प्रकरणी आपण 1500 MW भावली पंप स्टोरेज प्रोजेक्ट (PSP) करीता आवश्यक असलेल्या ठाणे जिल्हयातील शहापूर वनविभागाचे कार्यक्षेत्रातील मौजे कळभोंडे व मौजे कोथळे, ता. शहापूर येथील एकुण 181.45 हे.आर व नाशिक जिल्हयातील नाशिक पश्चिम वनविभागाचे कार्यक्षेत्रातील मौजे जामुंडे, ता. इगतपूरी येथील एकुण 94.3 पैकी 62.29 हे.आर. असे एकूण एकंदर 275.75 पैकी 243.74 हे.आर वनजमीनीचे वळतीकरणास केंद्र शासनाची मंजूरी मिळणेकामी वन (संवर्धन) अधिनियम, 1980 चे कलम 2 अंतर्गत प्रकल्प यंत्रणेने सुधारीत प्रस्ताव ऑनलाईन www.forest clearance.in वर सादर केलेला असून सदर प्रस्तावाचा सांकेतांक क्रमांक FP/MH/HYD/153240/2022 असा आहे. सदर प्रस्तावाची हार्ड कॉपी विहीत मार्गाने शासनाकडे सादर करण्यांत आलेली आहे.

तथापी महसूल व वनविभाग, मंत्रालय मुंबई यांनी सदर प्रस्तावांसंदर्भात संदर्भ क्रमांक 1 अन्वये त्रुटी उपस्थित केलेल्या आहेत. सदर त्रुटींचा पूर्तता अहवाल सादर करणेकामी आपले कार्यालयाकडून संदर्भ क्रमांक 3 अन्वये या कार्यालयास सूचीत केलेले आहे. त्या अनुषंगाने सदर त्रुटींचा पूर्तता अहवाल सादर करणेकामी प्रकल्प यंत्रणेस या कार्यालयाचे संदर्भ क्रमांक 4 अन्वये सूचीत करण्यांत आलेले होते.

प्रकरणी प्रकल्प यंत्रणेने खालीलप्रमाणे त्रुटींचा पूर्तता अहवाल संदर्भ क्रमांक 5 अन्वये या कार्यालयास सादर केलेला आहे.

| अ.क्र. | त्रुटी | पुर्तता |
|---|---|---|
| 1 | वळतीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे-कोथळे येथील गट क्र. २३ व मौजे-जामुंडे, ता. इगतपुरी, जि. नाशिक येथील गट क्र.४२, च्या इतर अधिकार | सदर मुद्दयाचे अनुषंगाने प्रकल्प यंत्रणेने अहवाल सादर केला आहे की, महसूल विभागाच्या नोंदींनुसार, ठाणे जिल्हयातील शहापूर येथील कोथळे |



Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| | अभिलेखावर खाजगी व्यक्तींची नावे दिसून येतात. तसेच वळतीकरणासाठी प्रस्तावित केलेले मौजे-काळभोंडे येथील क्षेत्र हे खाजगी वन आहे. त्यानुषंगाने सदर जमिनीच्या खाजगी हक्क धारकांचे ना-हरकत प्रमाणपत्र तसेच प्रकल्प यंत्रणा खाजगी हक्कधारकांना नियमानुसार नुकसान भरपाई देतील, याबाबतचे हमीपत्र सादर करावे. | गावात असलेले सर्व्हे क्रमांक २३ हे पूर्णपणे राखीव वन म्हणून घोषित केले आहे, ज्यामध्ये कोणतीही खाजगी मालकी नाही. जरी व्यक्तींची नावे "इतर हक्क" अंतर्गत येत असली तरी, ही क्षेत्रे वन हक्क कायदा (FRA), २००६ च्या कक्षेत येतात. प्रकल्प यंत्रणेने ०३.०३.२०२५ रोजी ठाणे जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयाकडून FRA प्रमाणपत्र मिळवले आहे आणि ते प्रस्तावात जोडले आहे. त्यांनी एक हमीपत्र सादर केले आहे की FRA कायदा, २००६ अंतर्गत बाधित व्यक्तींना प्रचलित सरकारी नियमांनुसार भरपाई दिली जाईल अशा स्वरुपाचे हमीपत्र प्रकल्प यंत्रणेने सोबत जोडलेले आहे. **परिशिष्ट-१**<br>ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील काळभोंडे गावातील ७/१२ जमीन उताऱ्यांमध्ये खाजगी वनजमिनीचे वर्गीकरण नोंदवले आहे. सध्या, प्रकल्प यंत्रणा खाजगी जमीन मालकीच्या बाबींवर काम करत आहोत; तथापि, प्रकल्प यंत्रणेने एक हमीपत्र सादर केले आहे सदर हमीपत्रामध्ये खाजगी वनजमिन मालकांची संमती सुरक्षित केली जाईल आणि त्यांना सरकारी नियमानुसार मोंबदला दिला जाईल. **परिशिष्ट-१** |
| 2 | वळतीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे-काळभोंडे येथील सर्व्हे नं. ७३/२ व ७२/१ या क्षेत्राचे अधिकार अभिलेख सादर करावेत. | प्रकल्प यंत्रणेने काळभोंडे गावातील भूखंड वळविण्यासाठी प्रस्तावित केलेल्या सर्व्हे क्रमांक ७३/२ आणि ७२/१ चे 7/12 उतारे सोबत सादर केलेले आहेत. **परिशिष्ट-2** |
| 3 | पर्यायी वनीकरणाकरीता प्रस्तावित केलेल्या वनेत्तर जमिनीवर ०.४ पेक्षा अधिक वृक्षघनता असल्याने, केंद्र शासनाच्या दिनांक २९.१२.२०२३ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदर क्षेत्रासाठी वृक्ष सुधारणा कार्यक्रम (Crop Improvement Programme) प्रस्तावित केला आहे. तथापि, वन (संरक्षण व संवर्धन) नियम, २०२३ मधील नियम १४ (५)(c) व मार्गदर्शक सूचनांमधील भाग-२ मधील परि. क्र. २.२ (ग) व २.४ नुसार पर्यायी वनीकरणासाठी ०.४ व त्यापेक्षा वृक्षांची घनता असलेले, कमीत कमी ५ वर्षापूर्वीचे वनीकरण झालेले कमीत कमी १० हेक्टर वनेत्तर जमिन Accredited Compensatory Afforestation म्हणून स्विकारण्यासाठी परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या उक्त जमिनी Accredited Compensatory Afforestation म्हणून सुयोग्य असल्याबाबत उपवनसंरक्षक यांचे प्रमाणपत्र सादर करावे. | सदर मुद्दयांचे अनुषंगाने नमूद करण्यांत येते की, विभागीय वन अधिकारी, चिपळूण यांचेकडील दिनांक 18/6/2025 रोजीचे पत्रान्वये अवर सचिव, महसूल व वने, मंत्रालय मुंबई यांचेकडे अहवाल सादर केलेला असून, सदर अहवालात नमूद केले आहे की, प्रकल्प यंत्रणेने पर्यायी वनिकरणासाठी मौजे चोरवणे येथील क्षेत्र 245.735 हे.आर. क्षेत्रावर नैसर्गिक पुनरुत्पादन (Natural Regeration) पध्दतीचे 0.4 पेक्षा जास्त वृक्षघनतेचा दाट झाडोरा असल्याचे क्षेत्राचे स्थळपाहणीवरुन निदर्शनास आलेले आहे. तेथे कोणत्याही प्रकारचे वृक्षलागवड कृत्रिम पध्दतीने करणेत आलेली नाही. तरी उक्त जमिनीस Accredited Compensatory Afforestation चे प्रमाणपत्र देणे उचित ठरणार नाही असे त्यांचे मत आहे. सदर पत्राची एक प्रत या कार्यालयास पृष्ठांकीत केलेली आहे. सदर पत्राची छायांकीत प्रत यासोबत सादर करण्यांत येत आहे. **परिशिष्ट-3** |

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| 4 | पर्यायी वनीकरणाकरीता मौजे चोरवणे, ता. खेड, जि. रत्नागिरी जिल्हातील सर्व्हे नं. ७१, ७२, ७३, ७४, ७५, ९१, ९२, ९३, ९४, ९५, ९६, ९७, ९८, १०१, १०२, १०३, १०४, ११३ व ११४ मधील २४७.७३५ हे. वनेत्तर जमिन प्रस्तावीत करण्यात आलेली आहे. तथापि, प्रस्तावासोबत सादर केलेल्या ७/१२ उताऱ्यावरुन सदर जमिन खाजगी जमीन धारकांच्या नावे असून, सदर जमिन प्रकल्प यंत्रणेस हस्तांतरण करण्याच्या अनुषंगाने कोणतेही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. केंद्र शासनास शिफारस करण्यापूर्वी सदर पर्यायी वनीकरणाच्या जमीनी प्रकल्प यंत्रणेच्या नावे अथवा जमीन धारक व प्रकल्प यंत्रणा यांच्यामध्ये झालेला नोंदणीकृत करारनामा सादर करावा. | जमिनीच्या नोंदींनुसार (७/१२ उतारे), प्रस्तावित जमीन खाजगी मालकीची आहे. भरपाई वनीकरणासाठी जमीन संपादनाची प्रक्रिया सध्या सुरू आहे. प्रकल्प यंत्रणा नमूद करते की प्रस्तावित क्षेत्राच्या अंदाजे १८५ एकरसाठी विक्रीसाठी पूर्व-करार अंमलात आणला गेला आहे आणि नोंदणीकृत आहे, तर उर्वरित क्षेत्राचे संपादन प्रगतीपथावर आहे.<br>त्यानुसार, प्रकल्प यंत्रणेने हमीपत्र सादर केलेले असून, तत्वत: मंजूरी मिळाल्यानंतर पर्यायी वनिकरणासाठी उपलब्ध करुन देण्यांत आलेली जमीन वनविभागाचे नांवे करण्याची कार्यवाही करणार असल्याबाबत नमूद केलेले आहे. **परिशिष्ट -4** |
| 5 | पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित असलेल्या मौजे चोरवणे येथील सर्व्हे नं. ९१/२ च्या भोगवटादार सदरी "महाराष्ट्र शासन" आणि सर्व्हे नं. ९३/८ भोगवटादार सदरी "खराबा सरकारी" अशी नोंद आहे. सदर जमिन शासकीय जमिनी असल्याने जिल्हाधिकारी यांच्यामार्फत प्रकल्प यंत्रणेस जमीन हस्तांतरीत केली असल्याबाबतचे कोणतेही कागदपत्रे सादर केलेली नाही. सदरची कागदपत्रे सादर करावीत. | प्रकल्प यंत्रणेने त्यांचे अहवालात नमूद केले आहे की, मौजे चोरवणे येथील सर्व्हे नं. ९१/२ व 93/8 चे क्षेत्र पर्यायी वनिकरणासाठी प्रस्तावित करण्यांत आलेले नाही. सदरचे 7/12 जमिनमालकाचे कागदपत्राचे संचिकेमध्ये असल्याने अनावधानाने प्रस्तावात जोडलेले आहेत. सदर कागदपत्र प्रस्तावातून वगळयात येतील अशा स्वरुपाचे हमीपत्र यासोबत सादर केलेले आहे. **परिशिष्ट-५** |
| 6 | पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित असलेल्या मौजे चोरवणे येथील सर्वे नं.९५/३, ९५/५, ९५/२०, ९६/१२, ९७-३, ९८/८, १०१/१४, १०१/१५, १०१/३०, ११३/१६ च्या इतर अधिकारामध्ये "मा. न्यायालयाच्या अथवा सी.बी.आय. यांचे मान्यतेशिवाय हस्तांतर होणार नाही" असे नमूद आहे. सदर क्षेत्र पर्यायी वनीकरणासाठी स्विकारणे कायदेशीर दृष्ट्या संयुक्तीक नाही. याबाबत आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय सादर करावेत. | प्रकल्प यंत्रणेने त्यांचे अहवालात नमूद केले आहे की, मौजे चोरवणे येथील सर्वे नं.९५/३, ९५/५, ९५/२०, ९६/१२, ९७-३, ९८/८, १०१/१४, १०१/१५, १०१/३०, ११३/१६ चे क्षेत्र पर्यायी वनिकरणासाठी प्रस्तावित करण्यांत आलेले नाही. सदरचे 7/12 जमिनमालकाचे कागदपत्राचे संचिकेमध्ये असल्याने अनावधानाने प्रस्तावात जोडलेले आहेत. सदर कागदपत्र प्रस्तावातून वगळयात येतील अशा स्वरुपाचे हमीपत्र यासोबत सादर केलेले आहे. **परिशिष्ट-6** |
| 7 | केंद्रस्थ अधिकारी यांनी प्रस्तावामध्ये शहापूर वन विभागामध्ये ५७, ६४६ इतक्या वृक्षांची तोड होणार असल्याचे नमूद केले आहे. तर, मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे यांनी स्थळपाहणी अहवालामध्ये ६१५५४ एवढ्या वृक्षांची तोड होणार असल्याचे नमूद केले आहे. तसेच नाशिक वन विभागामध्ये केंद्रस्थ अधिकारी व उपवनसंरक्षक, पश्चिम नाशिक यांनी ६२३५ इतक्या वृक्षांची तोड होणार असल्याचे नमूद केले आहे. परंतु ऑनलाईन पार्ट-२ मध्ये नाशिक विभागामध्ये ६४०४ वृक्ष असल्याचे नमूद केले | सदर मुद्दयाचे अनुषंगाने प्रकल्प यंत्रणेने नमूद केले आहे की, त्यांनी उपवनसंरक्षक नाशिक पश्चिम यांचेशी संपर्क साधून फॉर्म अ- (भाग-२) मध्ये तोड करावयाचे वृक्षांची संख्या अदयावत केली असलेबाबत खुलासा सादर केलेला आहे. **परिशिष्ट-7**<br>तसेच मुख्य वनसंरक्षक (प्रा), ठाणे हे सुधारीत आकडेवारी (प्रत्येक विभागात तोडल्या जाणा-या) झाडांची संख्येबाबतचा तपशिल अपर |



Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| | आहे. प्रकल्पामध्ये नेमकी किती वृक्षतोड होणार आहे, याची खातरजमा करुन, त्यानुसार सुधारित कागदपत्रे सादर करावीत. | प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रस्थ अधिकारी), नागपूर यांना लवकरात लवकर सादर करणार असलेबाबत प्रकल्प यंत्रणेने त्यांचे अहवालात नमूद केलेले आहे. |
| 8 | प्रकल्पाचा योग्य व प्रमाणित ले-आऊट प्लॅन सादर करावा. | प्रकल्प यंत्रणेने यासोबत सदरचा ले-आऊट प्लॅन सादर केलेला आहे. **परिशिष्ट-८** |

सदरचा पूर्तता अहवाल 4 प्रतीत आपले कार्यालयाकडे सादर करण्यांत येत असून, प्रकरणी उचित कार्यवाही होणेस विनंती.

(दीपेश मल्होत्रा)
उप वनसंरक्षक
शहापूर वनविभाग, शहापूर

प्रतिलिपी : मे. जेएसडब्ल्यु एनर्जी पीएसपी टु लि., जेएसडब्ल्यु सेंटर, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई - 400 051 यांना माहिती तथा उचित कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

Scanned with OKEN Scanner